CMYK

## राघवेंद्र नगरात विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर** : मजरेवाडी परिसरातील राघवेंद्र नगरात राहणाऱ्या एका ४५ वर्षीय विवाहित महिलेने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोमवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली. नयना देविदास सायमुर (वय ४५, रा. राघवेंद्र नगर) असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे. सोमवारी सकाळच्या सुमारास तिने घरातील छताच्या पंख्याला साडीच्या सहाय्याने गळफास घेतली होती. तिला फासातून सोडवून खाजगी रुग्णालयात दाखल केले असता ती उपचारापूर्वी मयत झाली. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार डोके पुढील तपास करीत आहेत.


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड


## मारहाण करीत रोख रक्कम पळवली

**सोलापूर** : महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथे अज्ञात तिघांनी मारहाण करीत खिशातील ५ हजार जबरदस्तीने काढून घेतल्याची घटना ९ फेब्रुवारी रोजी घडली. याप्रकरणी स्वप्निल खंडू शेंडगे (वय १९, रा.मु.पो. बेलाटी, ता. उत्तर सोलापूर) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला. महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथे कंपनीतील ग्राहकांना फोन लावताना गाडी क्रमांक (एम.एच-१३-४४१४) या बुलेटवरून आलेल्या अनोळखी तिघे आले. त्यांनी शेंडगे यास बाजूला पडलेली काडीपेटी दे असे म्हणल्यावर शेंडगे याने काडेपेटी न दिल्याने तिघांनी फिर्यादीस मारहाण केली व खिशातील जबरदस्तीने चार हजार नऊशे रुपये काढून घेतले.


www.surajyadigital.com । मंगळवार, दि. ११ फेब्रुवारी २०२५ । ▶ वर्ष : २३ वे ▶ अंक : १३४ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८


# तानाजी सावंत यांचा बेपत्ता मुलगा थरारक तपासानंतर अखेर सापडला

- पोलिसांकडे अपहरणाचा गुन्हा दाखल
- चार्टड फ्लाईट बँकॉकच्या दिशेने गेली

पुणे/प्रतिनिधी

**पुण्यात सोमवारी सायंकाळी हाहाकार माजला होता. राज्याचे माजी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांचा मुलगा ऋषिराज हा अचानक बेपत्ता झाल्याची माहिती समोर आल्यानंतर एकच खळबळ उडाली. त्यातच पुणे पोलिसांच्या कंट्रोल रुमला तानाजी सावंत यांचा मुलगा ऋषिराज सावंत याला दोघांनी विमानातून किडनॅप केल्याचा फोन आला. त्यामुळे पोलिसांची पळापळ सुरू झाली. सावंत लागलीच पोलीस आयुक्त कार्यालयात हजर झाले. चार तासांच्या थरारक तपासानंतर अखेर ऋषिराज सापडला. त्यानंतर पोलिसांनी सुस्कारा टाकला**



त्याचे असे झाले की, सावंत यांच्या मुलाचे अपहरण झाल्याचे वृत्त समोर आल्यानंतर एकच खळबळ उडाली. पुणे विमानतळावरून तो बेपत्ता झाला. सिंहगड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील नऱ्हे परिसरातून सायंकाळी ४.५७ वाजता स्विफ्ट गाडीतून तो आणि त्याचे मित्र पुणे विमातळावर गेले होते. त्यानंतर पुणे पोलिसांच्या कंट्रोल रुमलाही यासंदर्भात निनावी फोन आला.

दोघांनी पुणे विमानतळावरुन घेवून मुलाला फ्लाईटने गेल्याची माहिती देणारा फोन कंट्रोल रुमला आला.

यानंतर पोलीस यंत्रणा सज्ज झाली. आता या प्रकरणाबाबत पुणे पोलिसांनी मोठी अपडेट दिली आहे. तानाजी सावंत यांचा मुलगा आणि त्याचे दोन्ही मित्र हे परत पुणे विमानतळावर आले आहेत. ते सुखरुप आहेत, अशी माहिती पुणे पोलीस उपायुक्त रंजन कुमार शर्मा यांनी दिली. रंजन कुमार शर्मा आणि तानाजी सावंत यांनी पुन्हा पत्रकार परिषद घेत याबाबत माहिती दिली.



तानाजी सावंत



ऋषिराज सावंत

### शर्मा काय म्हणाले?

सोमवारी संध्याकाळी चार वाजेच्या सुमारास पुणे पोलीस कंट्रोल रुमला फोन आला की, माजी मंत्री तानाजी सावंत यांचा मुलगा ऋषिराज सावंतना कुणी अज्ञात व्यक्ती सोबत घेऊन गेला आहे. त्यानंतर लगेच सर्व यंत्रणा सक्रिय झाल्या. सर्व माहिती घेतल्यानंतर त्यांनी एक चार्टड फ्लाईट घेतली होती. ती फ्लाईट बँकॉकच्या दिशेला रवाना झाली होती. या फ्लाईटची ट्रॅकिंग आणि इतर गोष्टी करुन ही फ्लाईट आता पुण्यात लँड झाली आहे. फ्लाईटमधील तीनही पॅसेंजर सुखरुप आहेत. ते कोणत्या कारणासाठी चालले होते याबद्दल विचारपूस सुरु आहे. विचारपूस केल्यानंतर ते काय उद्देशाने बँकॉक जात होते, घरी का सांगितले नव्हते, ती माहिती समोर येईल. या प्रकरणात अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. चौकशीत काय क्लिअर होतो त्यातून पुढचा तपास ठरवला जाईल.

### तानाजी सावंत काय म्हणाले?

घरगुती वाद असे काहीच नाही. मुलगा ३० ते ३२ वर्षांचा झाला आहे. आमच्यात कधीही वाद झाला नाही. आम्ही सगळे सांप्रदाय पंथातील आहोत. रात्री व्यवस्थित गप्पा मारल्या, त्याने पहाटे साडेतीन वाजता रुद्रा अभिषेक केला. माझी पूजा चालू होती. तो पटकन नेहमी सारखे कॅम्पसला निघून गेला. म्हणून मी मगाशी बोलताना सांगितले की कीडनॅपिंग नाही तर मित्रांसोबत गेला आहे. पण न सांगता अचानक गेल्यामुळे अस्वस्थ झालो होतो, अशी प्रतिक्रिया तानाजी सावंत यांनी दिली.

### आता विचारावे लागेल

आता त्याच्यासोबत भेटल्यानंतर न सांगता टूर ठरली का? ते विचारावं लागेल. कारण आठ दिवसांपूर्वीच तो दुबईला जाऊन आला होता. त्यामुळे अचानक परत लगेच टुर ठरवल्याने पप्पा रागवतील का यामुळे सांगितलं नाही का? ते आता चर्चा केल्यानंतर समजेल. दुसरी गाडी घेऊन गेला आणि ड्रायव्हर परत आला त्यामुळे तो गेल्याचं समजलं, असं तानाजी सावंत म्हणाले.

### संशय का वाढला?

सावंत यांचा मुलगा ऋषिराज घरातून अचानक न सांगता निघून गेला. या प्रकरणी सिंहगड पोलिसात अपहरणाचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तानाजी सावंत यांनी पोलीस आयुक्तालय गाठून उपायुक्तांची भेट घेतली. सावंतांनी मुख्यमंत्री आणि नागरी वाहतूक मंत्री यांच्यापर्यंत संपर्क साधला.पुण्यात नाकाबंदी करण्यात आली. सावंत यांनी दिलेल्या तपशीलातही तफावत होती. बेपत्ता किंवा किडनॅपिंग असे काहीही नाहीय. ऋषिराजचे अपहरण झालेले नाही, असे सावंत यांनी सांगितले. पण पोलीस एफआयआरमध्ये अपहरणाचा उल्लेख आहे. सावंतांच्या मुलाचे विमानतळावरुन अपहरण झाल्याची माहिती निनावी कॉलद्वारे पोलिसांना मिळाली. तो फोन कोणाचा होता,हा प्रश्न अनुत्तरितच आहे. मुलगा बेपत्ता आहे किंवा अपहरण झाले असे काही नाही. त्याच्यासोबत त्याचे दोन मित्रच आहेत. त्याच्यासोबत नवीन किंवा अनोळखी कोणी नाही, अशी माहिती सावंतांनी दिली. त्यावर ऋषिराजसोबत नेमके कोण आहे, असा प्रश्न सावंतांना विचारण्यात आला. त्यावर त्याच्यासोबत असलेल्यांची नावे मला माहिती नाहीत, असे उत्तर सावंत यांनी दिले. या सगळ्या विसंगतींमुळे या प्रकरणातले गूढ वाढले होते.

## अनोळखी वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वार ठार

### कारंबा येथील घटना

सोलापूर/प्रतिनिधी

रेल्वे स्टेशन येथे पाहुण्यांना सोडून गावाकडे जात असताना अनोळखी वाहनाच्या धडकेने दुचाकीवरील तरुण गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात कारंबा (ता.उत्तर सोलापूर) येथील हॉस्पिटल जवळ रविवारी रात्रीच्या सुमारास घडला.

रवी हरिद्वार काळे (वय ३१, रा.मार्डी ता. उत्तर सोलापूर) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. तो रविवारी रात्री पाहुण्यांना रेल्वे स्टेशन येथे सोडून आपल्या दुचाकीवरून मार्डी येथे घराकडे निघाला होता. कारंबाच्या पुढे माने हॉस्पिटल जवळ अनोळखी वाहनाच्या धडकेने तो गंभीर जखमी झाला होता. त्याला मध्यरात्री वडिलांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. मयत प्रवीण काळे हा अविवाहित असून तो ड्रायव्हिंगचे काम करीत होता. त्याच्या पश्चात आई-वडील आणि एक बहीण असा परिवार आहे.गेल्या दोन महिन्यापूर्वी त्याच्या मोठ्या भावाचे आजाराने निधन झाले होते. त्याचे वडील मुंबई पोलीस खात्यातून निवृत्त झालेत, अशी माहिती मयताच्या नातेवाईकांनी दिली. या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## राजकीय वैमनस्यातून डोक्याला पिस्तूल लावून मारहाण

### महिलेसह ६ जणांवर गुन्हा; अकलूज येथील घटना

अकलूज/प्रतिनिधी

विरोधकाचे बॅनर लावणे तसेच राजकीय वैमानस्यातून एका तरुणाच्या डोक्याला पिस्तूल लावून मारहाण करीत त्याच्या अंगावरील ७ लाखांचे दागिने लुटल्याची घटना अकलूज येथील पंचशील नगरात शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणी अकलूजच्या पोलिसांनी महिलेसह ६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

अनिल उर्फ भैय्या किसन मोरे (वय ३२ रा. पंचशीलनगर) असे जखमीचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून राहुल सपकाळे, संजय उर्फ बापू साठे, राजू तूपसौंदर, शुभम सपताळे, नाना सपताळे आणि राणी सपताळे (सर्व रा.अकलूज) अशा ६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

अनिल उर्फ भैय्या मोरे हे शनिवारी सायंकाळी भाजी मंडई येथून गणेश नगरच्या दिशेने दुचाकिवरूर निघाले होते. त्यावेळी राहुल सपकाळे आणि बापू साठे या दोघांनी दुचाकि अडवून त्यांना बाजूला घेतले. आणि तू खा.धैर्यशील मोहिते पाटील यांच्या विरोधात तक्रारी अर्ज देतो का? तसेच विरोधकांचे बॅनर लावतोस का? असे म्हणत मारहाण केली. त्यावेळी बापू साठे याने त्यांच्या छातीवर बसून डोक्याला पिस्तूल लावत याला, लय माज आली. याच्या अंगावरील दागिने काढून घ्या, असे सांगितले. सोबत असलेल्यानी त्यांच्या अंगावरील १४० ग्रॅम सोन्याचे दागिने तसेच खिशातील ५० हजार रुपये काढून घेतले.हा प्रकार चालू असताना भांडण सोडवण्यास आलेला त्यांचा चुलत भाऊ मोहन मोरे याच्यासह चौघांना त्यांनी मारहाण केली. तसेच अनिल मोरे यांच्या दुचाकीची तोडफोड केली, असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास हवालदार पोरे करीत आहेत.

## दिल्लीनंतर पंजाबमध्ये सत्तापालट? काँग्रेसच गेम करण्याच्या तयारीत

**नवी दिल्ली** : दल्ली निवडणुकीचा निकाल हा आपसाठी सर्वात मोठा धक्का आहे. दिल्लीतील पराभवाचा परिणाम पंजाबवरही होऊ शकतो का असा प्रश्न विचारला जात असताना केजरीवाल यांनी ११ फेब्रुवारीला पंजाबमधील सर्व आमदार आणि मंत्र्यांची बैठक दिल्ली बोलवली आहे.

अरविंद केजरीवाल यांनी ही बैठक काँग्रेसचे नेता आणि पंजाब विधानसभेतील विरोधी पक्षनेते प्रताप सिंह बाजवा यांनी केलेल्या दाव्यानंतर बोलवली आहे. बाजवा यांनी दावा केला होता की, आपचे सुमारे ३० आमदार काँग्रेसच्या संपर्कात आहेत. बाजवा यांच्यासोबतच इतर काँग्रेस नेत्यांनीही आपचे आमदार संपर्कात असल्याचा दावा केला होता. आपने नेहमीच भाजपवर आमदार फोडण्याचा आरोप केला आहे मात्र आता काँग्रेसने आपला धक्का देण्याचा मनसूबा आखला असल्याचे दाव्यामधून दिसत आहे. त्यामुळे आपसाठी अडचणी वाढल्या आहेत.

पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान हे गेल्या तीन दिवसांपासून दिल्लीत आहेत. ९ फेब्रुवारी पंजाब पोहचले त्यानंतर त्यांनी सोमवारी होणारी मंत्रिमंडळाची बैठक १३ फेब्रुवारीपर्यंत स्थगित केली आहे.

## वैभव वाघे खून प्रकरण: फरार आरोपीला पोलिसांनी पुण्यात ठोकल्या बेड्या

सोलापूर/प्रतिनिधी

सिध्दार्थ हौसिंग सोसायटी सोलापूर येथे राहणाऱ्या वैभव वाघे याचा खून प्रकरणातील आणखी एका आरोपीला पोलिसांनी पुण्यात बेड्या ठोकल्या. योगेश ऊर्फ सोन्या गांधी अस्वले असे त्याचे नाव आहे. तो घटना घडल्यापासून फरार होता.

वैभव वाघे खून प्रकरणात प्रमोद गायकवाड, प्रसेनजीत उर्फ लकी गायकवाड, हर्षजीत गायकवाड, संजय उर्फ सोन्या देवेंद्र गायकवाड, मनोज राजू अंकुश, सनी निकंबे व योगेश ऊर्फ सोन्या गांधी अस्वले यांच्याविरुद्ध सदर बझार पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदवला आहे. यात सातजण अटकेत आहेत. या प्रकरणातील फरार आरोपी योगेश ऊर्फ सोन्या गांधी अस्वले यास पोलिसांनी पुणे येथून अटक करून न्यायालयात हजर केले. न्यायालयाने आरोपीस १२ फेब्रुवारी पर्यंत पोलीस कोठडी सुनावली. यात मूळ फिर्यादीतर्फे ॲड. संतोष न्हावकर, ॲड. वैष्णवी न्हावकर, ॲड. राहुल रुपनर, ॲड. शैलेश पोटफोडे तर यात सरकार पक्षातर्फे ॲड. अमर डोके तर आरोपीतर्फे ॲड. कदीर औटी हे काम पाहत आहेत.

## सराईत गुन्हेगार दोन वर्षासाठी तडीपार

सोलापूर/प्रतिनिधी

विविध प्रकारचे गंभीर गुन्हे करणाऱ्या नई जिंदगी येथील सराईत गुन्हेगारास दोन वर्षासाठी सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातून तडीपार केले आहे. याबाबतचा आदेश पोलीस उपायुक्त (परिमंडळ) विजय कबाडे यांनी दिले आहेत. मतीन म. शरीफ शेख (वय ४३, रा. सिद्धेश्वर नगर भाग ३ नई जिंदगी) असे तडीपार केलेल्या सराईत गुन्हेगाराचे नाव आहे.

मतीन शेख याच्याविरुद्ध सन २०१६, २०१७, २०१९ व २०२४ या कालावधीमध्ये जागेचे व वाहनांचे बनावट कागदपत्रे देऊन फसवणूक करणे, महिलांना दमदाटी करणे, खंडणी मागून पैसे उकळणे, पैसे न दिल्यास मारहाण करणे यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याच्यामुळे परिसरामधील नागरीक, व्यवसायांमध्ये मोठ्या प्रमाणात दहशतीचे वातावरण होते. त्याच्या वाढत्या गुन्हेगारी कारवायामुळे त्याच्याविरुद्ध तक्रार देण्यासाठी नागरिक धजावत नव्हते. त्यास तडीपार करण्याबाबतचा प्रस्ताव सदर बझार पोलीस ठाण्याकडून तयार करून पोलीस उपायुक्त विजय कबाडे (परिमंडळ) यांच्याकडे पाठविला. त्यानंतर कबाडे यांनी प्रस्तावाला मंजुरी देत दोन वर्षासाठी सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातून तडीपार केली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



माझा अर्ज बाद झाला तर गाडीचे हप्ते कसे भरू?

कल्याण
359-71-470

मुंबई
269-70-280

## आता महापालिकेची विशेष स्वच्छता मोहीम २.० सुरू

- आता अंतर्गत रस्ते होणार चकाचक
- विविध नगरातील रस्त्यांची होणार साफसफाई

सोलापूर/प्रतिनिधी

मुख्य रस्त्यांची स्वच्छता मोहीम यशस्वी केल्यानंतर आता सोलापूर महापालिका प्रशासनाने शहरातील अंतर्गत रस्ते साफसफाई करण्यासाठी विशेष स्वच्छता मोहीम २.० सुरू केली आहे. तिचा शुभारंभ सोमवारी झाला २२ पर्यंत ही मोहीम राबविण्यात येत आहे. कार्यपद्धतीसह अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारीही निश्चित करण्यात आली आहे.

महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या संकल्पनेतून यापूर्वी शहरातील मुख्य रस्ते स्वच्छता मोहीम यशस्वीपणे राबविण्यात आली. यामुळे मुख्य रस्ते चकाचक झाले. सोलापूरकरांकडून या मोहिमेचे स्वागत आणि



कौतुक झाले. त्याच धर्तीवर सूक्ष्म आणि नेटके नियोजन करत आता महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी अंतर्गत रस्ते चकाचक करण्यासाठी विशेष स्वच्छता मोहीम २.० चा शुभारंभ केला आहे.

सोमवारी शहरात अतिरिक्त आयुक्त रवी पवार, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये या मोहिमेचा शुभारंभ झाला. यावेळी मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, मुख्य आरोग्य निरीक्षक नागनाथ मेंडगुळे , बाबासाहेब इंगळे आदींसह अधिकारी उपस्थित होते. कामाच्या कार्यपद्धतीचा आराखडा तयार करण्यात आला आहे. संबंधित रस्ते आणि जबाबदारी निश्चित करण्यात आली. आरोग्य निरीक्षक अधिकारी व कर्मचारी , पथक प्रमुख आणि नियंत्रण अधिकारी अशा स्वरूपात जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत आता शहरातील अंतर्गत रस्ते चकाचक करण्यात येणार आहेत. सुमारे अंतर्गत ८० रस्ते आणि विविध नगरातील रस्त्यांची साफसफाई नेटक्या पद्धतीने करण्यात येणार आहे. झोन अधिकारी, आरोग्य निरीक्षक, स्वच्छता कर्मचारी यांना आपापली जबाबदारी सोपविली आहे.

### या विभागांचा राहणार सहभाग

स्वच्छता मोहिमेमध्ये महापालिकेचे घनकचरा व्यवस्थापन विभाग, एक ते आठ विभागीय अधिकारी, आवेक्षक, उद्यान विभाग, संगणक विभाग आणि अतिक्रमण प्रतिबंधक विभाग या विभागाकडे विविध कामे सोपविण्यात आली आहेत. महापालिकेच्या सर्व विभागांना सहभागी करून ही मोहीम पूर्ण सक्षमतेने राबविण्यात येणार आहे. सकाळी ६. ३० ते सकाळी ११ वाजेपर्यंत ही स्वच्छता व साफसफाईची कामे करण्यात येणार आहे.

### विशेष मोहिमेंतर्गत ही होणार कामे

रस्त्यावरील सर्व मुताऱ्या स्वच्छ करण्यात येतील, अनधिकृत फेरीवाले बसणार नाहीत याची दक्षता घेणार, घनकचऱ्यामध्ये असलेले साहित्य गोळा करण्यामाठी स्वतंत्र वाहनाची व्यवस्था, डिव्हायडर, रस्त्याच्या कडेवरील सर्व अनावश्यक साहित्य, कचरा, प्लास्टिक उचलण्यात येणार, डीव्हायडमध्ये रोपांची पुन्हा लागवड करण्यात येणार, रस्त्यांचे, चौकांचे नावाचे बोर्ड स्वच्छ करून करण्यात येणार, त्यावरील अनाधिकृत स्टिकर्स, जाहिराती काढणार, सर्व रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात येणार.

CMYK